2019 - 20

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

आंबेडकरवादी मराठी कविता
**डॉ. चंद्रसेन सावळाराम आवारे** 139

आंबेडकरवादी मराठी कथा आणि कथाकार
**प्रा. डॉ. चव्हाण श्रीहरी दासू** 293

आंबेडकरवादी मराठी कवितेतून व्यक्त होणाऱ्या जाणिवा
**प्रा.डॉ. रेखा नारायण वाघ** 296

आंबेडकरवादी जाणिवेची कविता : 'युध्दपक्षी'
**प्रा.डॉ. शेषराव नाईकवाडे** 299

आंबेडकरवादी मराठी साहित्यातील स्त्री कविता
**डॉ. योगिता देवगिरीकर (कथले)** 302

आंबेडकरवादी स्वकथन आठवणींचे पक्षी तील उच्चनीचता
**प्रा.डॉ.अनिल कांबळे** 305

आंबेडकरवादी मराठी साहित्य व साहित्याचे नवीन प्रवाह
**डॉ.सुरेश शिंदे** 308

समकालीन आंबेडकरवादी कविता
**डॉ.सिंधू बाबाराव सोलापुरे** 312

सामाजिक परिवर्तनाचा अनुबंधः आंबेडकरी रंगभूमी
**डॉ. गायकवाड बालू भागवत** 315

वाङ्मयीन चळवळींच्या अनुषंगाने
**प्रा.डॉ.अक्षय किशोर घोरपडे** 317

धम्मपाल रत्नाकर यांच्या साहित्यातील आंबेडकरवाद
**डॉ.गिरीश मोरे** 320

आंबेडकरवादी कवितेतील समीक्षाविचार
**कोंडबा भगवान हाटकर** 322

जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी आंबेडकरवादी कवितेतील प्रतिमाविश्व
**प्रा.सुदाम राठोड** 325

आंबेडकरवादी कवितेतील विद्रोह
**प्रा.डॉ.संतोष जगन्नाथ जाधव** 329

# आंबेडकरवादी मराठी कविता

डॉ. चंद्रसेन सावळाराम आवारे

मराठी साहित्यात नवनवीन प्रवाह, विचार येत असतात. १९२५ नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ मराठीत सुरु झाली. १९६० नंतरच्या काळात दलित साहित्याचा उदय झालेला आढळून येतो. अलिकडे स्त्रीवादी साहित्य तसेच आदिवासी साहित्याचा उदय झालेला आपणास पहावयास मिळतो. आंबेडकरवादी मराठी कवितेत शिरकाव करण्यापूर्वी दलित साहित्य या संकल्पनेचे स्वरुप समजावून घेणे महत्त्वाचे आहे. दलित साहित्याला 'दलित जाणिव' व 'दलित साहित्य' या संज्ञा आज प्रचलित असून त्याचे अर्थ स्पष्ट केल्यास दलित साहित्याचे स्वरुप अधिक स्पष्ट होईल. १९६० नंतर दलित साहित्य ही एक नवीन वाङ्मय चळवळ उदयाला आली आहे. ही चळवळ केवळ वाङ्मयीन चळवळ नसून सामाजिक परिवर्तनाशी तिचे अगदी जवळचे नाते आहे. आधुनिक मराठी साहित्यात जे नवीन वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले आहेत, त्यामध्ये दलित साहित्याच्या प्रवाहाने चांगलीच खळबळ उडवून दिलेली आपणास दिसून येते. मराठी साहित्याच्या क्षितिजावर ही निळी पहाट उदयाला आली आहे. कथा, कविता, नाटक, कादंबरी व आत्मकथन अशा किती तरी वाङ्मय प्रकारातून दलित साहित्याचा अविष्कार झाला आहे. या दलित साहित्यातील मूकनायक नव्यानेच जागृत झाला असून त्याने जे आजपर्यंत भोगले, सोसले व अनुभवले ते सांगण्याची गरज दलित तरुणांना वाटू लागली आणि त्यातूनच दलित आत्मकथने निर्माण झाली आहेत. ही स्वकथने मराठीतील आत्मचरित्राहून अगदी भिन्न स्वरुपाची असल्याचे पहावयास मिळते.

दलित साहित्यामागे 'दलित' हे विशेषण लावले जाते. "दलित म्हणजे आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला" असा एक सामान्य अर्थ आहे. दुःख, दैन्य, दारिद्र्य यांनी गांजलेली जीवने म्हणजे दलित जीवने होतं, असे सारांशाने म्हणता येईल. डॉ. सदा कऱ्हाडे यांनी दलित शब्दाची सर्वसमावेशक अशी व्याख्या केलेली दिसून येते. त्यांच्या मते, "आर्थिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मिळून एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर, उपजीविकेसाठी श्रम करणारे आणि अस्पृश्यही येतील. ज्यांची पिळवणूक होते ते सर्व दलित. म्हणजेच दलित हा मानवी प्रगतीमध्ये सर्वात मागे पडलेला आणि रेटलेला वर्ग असल्याचे दिसून येते." यावरुन दलित हा शब्द केवळ बौद्ध अथवा मागासवर्ग नव्हे तर जे जे पिळले गेले आहेत व जे श्रम करुन आपले दररोजचे पोट भरतात, ते सर्व दलित या शब्दांत समाविष्ट करता येतील. तसेच 'दलित साहित्य' हा देखील एक बहुचर्चित विषय आहे. दलित साहित्य म्हणजे धर्माने आणि सामाजिक रुढीने ज्यांना आजवर बहिष्कृत मानले, त्या लेखकाचे साहित्य म्हणजे दलित साहित्य, असे डॉ.म.ना. वानखेडे यांना वाटते. तर हिंदू धर्मातील रुढींनी ज्यांना जन्मजात अस्पृश्यता दिली आहे, अशा अस्पृश्यांनी आपल्यावरील या जन्मनिष्ठ कनिष्ठावरील अन्यायाविरुद्ध ज्या साहित्यात आवाज उठविला आहे, ते साहित्य म्हणजे दलित साहित्य, असे डॉ.वि.स. जोग यांना वाटते. दलित साहित्य म्हणजे केवळ दलितांचे साहित्य नव्हे तर दलित जाणिवेतून लिहिलेले ते दलित साहित्य, ही भूमिका सर्वमान्य.

...ण्यासारखी आहे. दलित साहित्याचा भर प्रामुख्याने ही जुनी मूल्ये टाकून देवून नव्या मूल्यांवर अधिष्ठित अशा प्रकारची समाजरचना करण्यावर आहे. दलित साहित्याचा भर प्रामुख्याने अज्ञान, दारिद्र्य व पिळवणूक नाकारुन एक बंदिस्त समाज निर्माण न करता खुला भयमुक्त समाज निर्माण करण्यावर आहे.

**दलित वेदनेचे आदिरुप :-**

दलित वेदनेचे आदिरुप म्हणजे संत चोखामेळा होय. दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या चिरवेदनेचा पहिला हुंकार १३ व्या शतकात चोखामेळा यांच्या अभंगात सापडतो. ही वेदना त्यांची एकट्याची नसून समूह मनाची आहे.

**"ऊस डोंगा परि रस नोव्हे डोंगा । काय भूललासी वरलिया अंगा ।।"**

अशी तत्त्व चिंतनाची भूमिका मांडणारा चोखामेळा अस्पृश्यतेचे चटके बसून आर्त बनला होता. सवर्णांनी केलेला छळ सहन तो विठ्ठलाला शरण जातो.

**"हीन याती माझी देवा । कैसे घडेल तुझी सेवा ।।**
**मज दूर दूर हो म्हणती । तुझ भेटू कवण्या रिती ।।"**

म्हणून तो आपले दुःख मांडतो. त्याचे सारे कुटुंबच विठ्ठल भक्तीत रंगून गेले होते. त्याच्या बंडखोर मनाच्या मुलाने कर्ममेळ्याने अस्पृश्यतेबद्दल प्रथम विठ्ठलालाच जाब विचारलेला पहावयास मिळतो.

**"आमची केली हीन याती । तुला न कळे श्रीपती ।।**
**जन्म गेला उष्टे खता । लाज न ये तुझ्या चित्ता ।।"**

असा परखड प्रश्न करणारा दलित तत्वज्ञ तत्कालीन परिस्थितीत फक्त कर्म मेळाच आढळतो. म्हणून चोखामेळा व कर्ममेळा हे दलित कार्यकर्त्यांचे खरेखुरे प्रतिनिधी म्हणून शोभून दिसतात. कर्ममेळ्याने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर विठ्ठलाजवळ नव्हते. हे सर्व पाहता चोखामेळ्यानेच प्रथम अभंगातून दलितांच्या वेदनेला शब्दरुप दिल्याचे दिसून येते. हेच दलित साहित्याचे आद्यरुप मानावे लागते.

यानंतरच्या प्रदीर्घ कालखंडात वेदनेचा हुंकार लूप्त झालेला पहावयास मिळातो. पंत, तंत आणि अव्वल इंग्रजी कालखंडात दलितांच्या व्यथा, वेदनांना कुणीच शब्दरुप दिलेले दिसत नाही. यावरुन वर्णव्यवस्थेची पकड समाज मनावर किती घट्ट होती हे दिसून येते. दीन-दलितांच्या जाणिवेला, जगण्याला काडीचीही किंमत नव्हती. गावकुसाबाहेर पिढ्यान् पिढ्या ही दलित मंडळी दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धेत खितपत पडलेली दिसून येते.

**दलित साहित्याची प्रेरणा :-**

२० व्या शतकाच्या आरंभी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शाहू महाराज यांचा उदय झाला आणि दलितांचे लाजिरवाणे जिणे संपण्याची चिन्हे दिसू लागली. दलित साहित्या मागील मुख्य प्रेरणा ही डॉ.आंबेडकरांच्या विचारांची आणि तत्त्वज्ञानाची असलेली दिसून येते. डॉ. आंबेडकर या युगपुरुषाने विचार, प्रचार आणि वाणीने स्व-समाजाचे आत्मज्ञान जागृत केले. हजारो

वर्ष गुलामगिरीत खितपत पडलेल्या दलित बांधवांना त्यांच्या माणूस म्हणून जगण्याच्या हक्काची प्रखर जाणीव करुन दिली.

गावकुसाबाहेरचं जीवन जगणाऱ्या दलित समाजाच्या व्यस्था मुखर करणारी दलित कविता १९५६ नंतर जन्माला आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणा या काव्याला प्रेरक ठरत गेल्या. डॉ. आंबेडकर म्हणत, "जो पर्यंत दलितांच्या हाती सत्ता येणार नाही, तो पर्यंत खऱ्या अर्थाने ह्या देशात लोकशाही समाजवाद येणार नाही. म्हणून खरी लोकशाही निर्माण करावयाची असल्यास आज हजारो वर्ष डोक्यावर नाचत असलेला वरचा वर्ग खाली आणि समाजातील खालचा वर्ग वर गेल्याशिवाय खरी क्रांती होणार नाही. क्रांतीचे चक्र अर्धेच फिरते आहे. हजारो वर्ष अंधारात, अज्ञानात पडलेल्या दलित जीवनाला डॉ. आंबेडकरांनी आत्मभानाचा प्रकाश दिला, जागृत केले. त्यांच्या ठायी स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित केली, अन्यायाला निर्धाराने प्रतिकार करण्याचे सामर्थ्य निमार्ण केले. म्हणून दलित साहित्याचे एकमेव प्रेरणास्थान म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचाच उल्लेख करावा लागेल, म्हणून १९६० नंतर उदयाला आलेल्या दलित साहित्याच्या प्रेरणा आंबेडकरी प्रेरणाच आहेत."

डॉ. बाबासाहेबांचे विचार हे दलित लेखकांना दिपस्तंभाप्रमाणे आहेत. आजचे दलित साहित्य हे जीवनवादी भूमिका स्विकारुन आंबेडकरी विचार प्रणालीचा पुरस्कार करते. बाबासाहेबांचे विचार ही दलित साहित्यांची प्रेरणाशक्ती ठरली आहे. विद्रोह, नकार आणि दुःख म्हणजे दलित साहित्य. दलित साहित्य हे ईश्वर, आत्मा, अध्यात्म, वर्ण व जाती व्यवस्था मानत नाही. या समाज व्यवस्थेमुळेच आपल्याला गावकुसाबाहेरचे जीवन जगावे लागले, याची जाणीव दलित लेखकांना आहे. म्हणून त्यांचे साहित्य या विरुद्ध बंड करते. याला प्रमुख कारण म्हणजे आंबेडकरांचे कार्य आणि तत्त्वज्ञान होय. डॉ. आंबेडकरांनी दलितांना मुक्तीचा मार्ग दाखविला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वांचा पुरस्कार केला. त्यांनी दलित बांधवांना 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश दिला. त्यांचे धारदार तत्त्वज्ञान दलित लेखकांना स्फूर्तिदायक ठरले आहे.

**दलित कवितेचे स्वरुप :-**

मराठी कवितेत दलित कविता ही आता एक प्रस्थापित झालेली वस्तूस्थिती आहे. दलित कविता ही संज्ञा आपण दलित कवीची कविता या अर्थाने वापरीत आहोत. दलित कवी हा प्रथम दलित असावा लागतो. दलित कवी हा सर्व प्रथम कवीही असला पाहिजे. त्याशिवाय त्याचे लेखन कविता या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वाङ्मय प्रकारात बसणार नाही. दलित साहित्याने मराठी साहित्याला मूलायम आणि मखमली स्वप्नसृष्टीतून आज वास्तवतेच्या काटेरी भूमिकेवर आणले आहे.

दलित कविची कविता **सामाजिक बांधिलकीची** कविता आहे. दलित समाजाच्या अन्यायाविरुद्ध अमानुषतेविरुद्ध, शोषणाविरुद्ध आणि मानवी मूल्यांच्या प्रस्थापनासाठी जो लढा चाललेला आहे. त्यामधील एक हत्यार म्हणून तिचा वापर अधिक केला जातो आहे. मात्र साऱ्याच कविता हत्यार म्हणून अस्तित्त्वात आलेल्या नाहीत. त्याबाबत सु. म. पाटील म्हणतात, "गोलपिठाकार ढसाळ आणि यशवंत मनोहर आपल्या कवितेचे कवितापण बऱ्याच प्रमाणात जपताना दिसतात. उलट मेश्राम

यांची कविता हत्यार म्हणून क्वचितच आकाराला येते. वर्गीय वेदना मात्र जवळ जवळ साऱ्याच कवितेतून अविष्कृत होताना दिसतात. तिचे सर्वात कमी अविष्कार केशव मेश्राम यांच्या कवितेत आढळतात. ती वैयक्तिक वेदनांना अधिक रुप देते. ढसाळ-मनोहरांच्या कवितेतून त्यांच्या मनात मुरलेले, रक्ताच्या पेशीपेशींमध्ये भिणलेले वर्गीय अनुभव विश्व बाहेर येते. तसे मेश्राम यांच्या कवितेबाबत होत नाही. ते या अनुभव विश्वाच्या थोडे बाहेरचे वाटतात. त्या मानाने ढसाळ-मनोहरांची प्रतिमासृष्टी त्यांच्या अनुभव रुपांना साजेशी वाटते. ती अंगासरशी असते. याचाच अर्थ असा की, साऱ्याच कवींना सामाजिक बांधिलकी मानावलेली नाही.''

''**रथाला म्हारडा शिवला, हाणा मारा साल्याला**'' किंवा ''**मंदिरात ये भडविच्या प्रसाद बाटविला**'' असे बोल लावून त्यास सदोदीत अपमानित करण्यात आले. सार्वजनिक जीवनात तर ''**आमची पंगत उकिरड्यावर का ? आमच्याकडे येतानाच शिरा संपतो.**'' हे भीषण वास्तवाचे जग 'कोंडवाडा' मधील दया पवारांची कविता मुखर करुन जाते. हे चित्रण कल्पनेच्या भराऱ्या मारणारे नसते तर **प्रखर व वास्तववादी** असते. हा वास्तववाद वेदनेच्या पावलांनी दलित कवितेत येतो व अनंत काळांच्या जखमा मुखर करुन जातो. दलित कविता ही मूळातच वास्तववादी भूमिकेतून जन्माला आलेली पहावयास मिळते. बहुतेक दलित कवींची कविता **वैयक्तिक अनुभवाचं अविष्करण** करताना दिसून येते. दया पवारांची 'कोंडवाडा' मधील कविता असो किंवा हिरा बनसोडे यांची 'फिर्याद' मधील कविता असो, ती वास्तववादी भूमिकेतूनच वैयक्तिक अनुभवाचं अविष्करण करताना दिसून येते.

**संदर्भ :-**


१) वासूदेव मुलाटे - दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरुप

२) डॉ. म.ना. वानखेडे - अध्यक्षीय भाषण स्मरणिका - दलित साहित्य संमेलन १९७६ - पृ. ६७

३) डॉ. स.दा. कऱ्हाडे - दलित साहित्याच्या निमित्ताने : मुंबई- सत्यकथा - जुलै १९७० - पृ. २३

४) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - निकाय - नागपूर - ऑगस्ट/सप्टेंबर १९७३ - पृ. ०५

५) नामदेव ढसाळ - आम्ही दिवाळी अंक - १९७३ - पृ. ७७

६) कुमूद पावडे - अंतःस्फोट - पृ. ४५

७) दया पवार - कोंडवाडा

८) सकलसंत गाथा - संत चोखामेळा



**डॉ. चंद्रसेन सावळाराम आवारे**

मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

Special Issue August 2019

# विद्यावार्ता ®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/

ISSN-2319


डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

आणि

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विषयार्तंगत राष्ट्रीय चर्चासत्र



# वैचारिक मराठी साहित्य :

## शोध, स्वरुप व अभिव्यक्ती

संपादक

डॉ.देविदास खोडेवाड

13) संत गाडगेबाबांची वैचारिकता
**डॉ. विठ्ठल केदारी, अंबाजोगाई** ||63

14) राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शेती विषयक कार्य
**प्रा.डॉ. मोरे संगीता दत्ताजी,जि.बीड** ||66

15) मराठी वैचारिक साहित्यातील डॉ.आ.ह.साळुंखे यांचे योगदान
**प्रा.डॉ.साहेबराव शिंदे ,नांदेड** ||68

16) **सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण**
**प्रा.डॉ.शंकर वाघमारे, नेकनूर** ||70

17) ारिवर्तनवादी गो.ग. आगरकर
**प्रा.उदार एन. एस., घाटनांदूर** |72

18) प्रबोधनकार गोपाळ गणेश आगरकरांच्या साहित्यातील वैचारिकता
**डॉ. बालाजी डिगोळे, नळेगाव** ||74

19) संत तुकारामांच्या अभांगातील समाज प्रबोधन : एक चिंतन
**प्रा.डॉ.कोतमे धिरजकुमार सत्येकाल, लातूर** ||77

20) मराठी कादंबरीतील उच्च शिक्षित स्त्रीचे चित्रण
**प्रा.केशव धोंडिबा टिपरसे,सांगली** ||80

21) दुष्काळावरील निबंधाचा वास्तवदर्षी आणि वैचारिक दस्तऐवज
**लक्ष्मण व्यंकट बिराजदार** ||83

22) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार
**डॉ.आर.बी.धायगुडे** ||86

23) मुलगामी समाजपरिवर्तन चळवळीचे आद्य प्रवर्तक : महात्मा फुले
**डॉ.अमजद हारुण अत्तार** ||88

24) परीवर्तनवादी प्रबोधनकारांचा परिचय
**प्रा.भैरवी कावरे (मेश्राम),अमरावती.** ||90

25) परिवर्तनवादी प्रबोधनकार - गोपाळ गणेश आगरकर
**प्रा. डॉ. आवारे सी. एस.,बीड** ||94

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

उन्नती व्हावयाची तर खेडयाची सर्वांगीण सुधारणा झाली पाहीजे असे त्यांचे मत होते. राष्ट्रसंतांनी ग्रामीण–जीवनाची सर्वागोण सुधारणा घडवून आणण्याकरीता ग्राम विकासाचा योग्य विचार 'ग्रामगीता' हया ओवीबद्ध ग्रंथात त्यांनी मांडला आहे. राष्टसंतानी आपल्या खंजेरी वाजवून जनजागृती करायचे त्यानुसारंचते प्रबोधन करायचे.

◆ निष्कर्ष :

१.शाहु महाराजांनी शिक्षण संस्थाची स्थापना करुन शिक्षण विषयक सोयी सवलती उपलब्ध करुन दिल्या त्यातूनच त्यांनी परीवर्तन घडवून आणले.

२.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले जीवनच आपल्या दीन दलित समाजाला जागश्त करण्यासाठी समर्पित केले.

३. महात्मा जोतीबा फुले यांनी स्त्रीयांसाठी शिक्षण हे किती महत्त्वाचे ते पटवून समाजसुधारणा घडवून आणली.

४. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्वत': हाल अपेष्टा सहन करुन स्त्रिला शिक्षण देऊन समाज प्रबोधन केले.

५. ताराबाई शिंदे यांनी आपल्या वैचारीक तेनुसार स्त्रीवादी रुढी परंपरावर प्रखर प्रहार केला.

६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्राचे संत यांनी ग्रामगीता लिहुन प्रबोधन केले व परीवर्तन घडविले.

◆ संदर्भ ग्रंथ :

१. 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग व राज्यसेवा मुख्य परिक्षा', विनोद सगरे विजन एंटरप्राईजेस, पुणे.

२. 'भारतीय साहित्याचे निमति, विठ्ठल रामजी शिंदे' गो.मा. पवार साहित्य अकादमी २००० प्र.क्रं. ५५, चेन्नई.

३. 'राष्ट्रसंताचे सामाजिक आणि धार्मिक विचार' डॉ. गजानन शं. वेले वेद मुद्राप्रकाशन २०१०, अमरावती.

४. सावित्रीबाई फुले 'व्यक्तित्व आणि कवित्व प्रा.सतीश तराळ, बजाज पब्लिकेशन २०००, अमरावती.

महाराष्ट्रातील समाज सुधारक, विद्या पब्लिकेशन, औरंगाबाद, जून २०१३.

**25**

# परिवर्तनवादी प्रबोधनकार - गोपाळ गणेश आगरकर

**प्रा. डॉ. आवारे सी. एस.**
(मराठी विभाग प्रमुख)
कला व वाणिज्य महाविद्यालय,
चौसाळा, ता. जि. बीड

**********

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आगरकरांचे नाव एक दृष्टे, कळकळीचे व सत्वशील समाज सुधारक म्हणून प्रसिध्द आहे. ते समाज सुधारकांचे अग्रणी म्हणून ओळखले जातात. ते उत्तम मराठी पत्रकार होते. गोपाळ गणेश आगरकरांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी सातारा जिल्ह्यातील टेंभू या खेड्यात एका गरीब ऋग्वेदी ब्राम्हण कुटूंबात झाला. गो. ग. आगरकर यांच्या लहानपणी घरची खुपच गरिबी होती. त्यांच्या पत्नीचे नाव यशेदाबाई होते. त्यांना यशवंत व माधव अशी दोन मुले व आणखी दोन मुली अशी चार अपत्ये होती. आगरकर गरिबीतच लहानाचे मोठे झाले.

घरच्या गरिबीमुळे शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी त्यांना अनेक मार्ग चोखाळावे लागले. कधी मामलेदार कचेरीत काम करून तर कधी माधुकरी मागून तर कधी दवाखान्यात कम्पाउंडरचे काम करून त्यांनी आपले मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणासाठी ते कज्हाड, रत्नागिरी व अकोला येथे गेले. १८७५ साली ते मॅट्रीक पास झाले व महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी त्यांना अतोनात कष्ट घ्यावे लागले. शिष्यवृत्तीच्या व बक्षिसांच्या बळावर ते डेक्कन कॉलेजमध्ये बी. ए. (१८७८) झाले. नंतर ते १८७९ मध्ये एम. ए. चा अभ्यास करू लागले. एम. ए. पूर्ण झाल्यानंतर काही काळ त्यांनी अध्यापनाचे ही कार्य केले व शेवटी प्राचार्य पदाच्या हुद्यापर्यंत पोहचले. एम. ए. करत असतानाच त्यांची ओळख लोकमान्य टिळकांशी झाली. दोघांनी एकत्र शिक्षण घेतले. लोकमान्य टिळकांनी केसरी हे वृत्तपत्र सुरू केले होते. त्याची सर्व जबाबदारी टिळकांनी आगरकरांवर सोपविली.

गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य टिळक हे दोघेळी परस्परांचे चांगले मित्र होते. दोघेही ध्येय वेडे व त्यागी वृत्तीचे होते. तरीही आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा या विषयावर

दोघांचे मतभेद होऊन दोघांचे मार्ग वेगवेगळे झाले. टिळकांचा पिंड अधिक राष्ट्राभिमानी व धर्माभिमाणी होता. टिळकांनी परंपरावादाचा पुरस्कार केला व स्वत:ला राजकीय संघर्षात झोकून दिले. तर आगरकर काहीसे पाश्चात्य विचारसरणीचे सुधारणावादी होते. ते विचासने, वर्तणुकीने कितीही थोर व नि:स्पृह असले तरी त्यांचा हिंदू संस्कृती व धर्म यांचा सखोल अभ्यास होता असे म्हणता येणार नाही. पाश्चात्यांच्या चालीरीती उचलल्याशिवाय व भारतीय रूढी परंपराचा त्याग केल्याशिवाय भारताचा उध्दार होणार नाही, अशी प्रामाणिक समजूत आगरकरांची होती. म्हणून आगरकरांनी मोठ्या आवेशाने व तळमळीने समाज सुधारणांचा पुरस्कार केला व समाज सुधारणेच्या कार्यासाठी आपले जीवन अर्पण केले. या मतभेदामुळे टिळक व आगरकर वेगळे झाले व आगरकर १८८७ साली केसरीतून पडले. त्यांनी पुढे सुधारणावादाचा पुंरस्कार करणारे घ्सुधारकङहे नवे पत्र १८८८ साली काढले.

सुधारकांतील लेख हे अत्यंत जहाल व मर्मभेदक असून त्यातून सनातनी लोकांवर प्रखर टीका असे. त्यामुळे लोकनिंदा व लोकछळ आगरकरांना सहन करावा लागला. पुण्याला ते केसरीचे संपादक असताना बर्वे प्रकरणात त्यांना टिळकांसोबतच डोंगरीच्या तुरूंगात १०१ दिवसाचा तुरुंगवास भोगावा लागला. येथेच त्यांनी हॅम्लेटच्या नाटकाचे मराठी रूपांतर घविकार विलसीतङनावाचे केलेले आहे. शिवाय डोंगरीचे १०१ दिवस नावाचे एक छोटे पुस्तकही लिहीले आहे. ते शरीराने रोगी व दुर्बल असले तरी मनाने मात्र खंबीर व झुंझ ाार होते. लोकनिंदेची व छळाची पर्वा न करता त्यांनी सुधारणेचा पुरस्कार करण्याचे कार्य चालूच ठेवले. १८९० पासून त्यांचा दम्याचा आजार बळावत गेला व शेवटी जून १८९५ मध्ये त्यांचे देहावासन झ ााले.

आगरकरांचे वाङ्मयीन कार्य - सुधारक पत्रातील लेख अथवा निबंधा शिवाय त्यांनी तीन पुस्तके लिहीली आहेत.

१) डोंगरीच्या तुरूंगातील १०१ दिवस

२) वाक्यमीमांसा - हे मराठीतील व्याकरणावरील पुस्तक असून व्याकरणच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

३) विकार - विलसीत - हे त्यांनी शेक्सपिअरच्या हॅम्लेट नाटकाचे मराठीत रूपांतर केलेले आहे. नाटकासारख्या विषयाकडे आपल्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ती नाही, असे जे आगरकरांनी सांगितले आहे, ते त्यांच्या इतर कार्याच्या व्यापावरून सहज पटते. आगरकरांच्या दृष्टीने शेक्सपिअर हा एक महाकवी होताआणि हॅम्लेट ही त्यांची श्रेष्ठतम अशी एक कृती आहे. मूळ नाटकाचा वाङ्मयीन दर्जा आणि अनुवादाची विव्दता यामुळे इंग्रजीतून भाषांतरीत झालेल्या नाटकापैकी सर्वात अधिक कसोटीने जर कोणत्या रूपांतराची समीक्षकांकडून अत्यंत बारकाव्याने चिकित्सा झाली असेल तर ती आगरकरांकडून विकार-विलसीत या हॅम्लेटच्या रूपांतराची होय. प्रयोगानुकूल भाषा सौष्ठवाचा अपेक्षेने आगरकरांचे हॅम्लेटचे रूपांतर काहीसे रूक्ष व बोजड असले तरी ते करताना अभिजात साहित्याच्या मौलिक दृष्टीने त्यांनी त्यासंबंधी विचार केला होता, चिंतन केले होते. नाटकाच्या साहित्यात्मक आणि रंगमूलक अंगाच्या सापेक्ष संबंधाची त्यांना स्पष्ट कल्पना आलेली होती आणि नाटकाच्या भाषांतरासारख्या त्यांच्या मनाचा स्वाभाविक कल नसलेल्या विषयातही आपली तत्वनिष्ठ सुधारणावादी प्राकृतिक भूमिकाच बळकट निष्टेने ते वटवीत होते, असे दिसून येईल.

अनुवादीत नाट्यकृतींच्या मराठी रंगभूमीवरील प्रयोगासंबंधी धोरण आणि त्यांच्या साहित्यिक अंतरंगाबद्दलच्या वाङ्मयीन अपेक्षा यांच्या संदर्भात आगरकरांनी आपल्या विकार विलसीतच्या प्रस्तावनेत ग्रंथीत केलेले औपपत्रिक विचार अत्यंत समर्पक आणि मूलग्राही असून आजही मननीय आणि मार्गदर्शक वाटावेत इतक्या मोलाचे आहेत यात संदेह नाही.

श्री. अ. ना. देशपांडे ह्यांनी आगरकरांच्या निबंधाचे चार वर्ग पाडले आहेत. ते असे -

१) नित्यनैमित्तिक विषय - उदा. स्त्रियांचा पेहराव, सोवळे, प्रेतसंस्कार इत्यादी

२) संशोधनात्मक व ऐतिहासिक लेख - उदा. देवोत्पत्ती, मूर्तिपूजा, मरणोत्तर स्थिती इत्यादी

३) सामाजिक सुधारणापर लेख

४) स्त्री-जीवन विषयक लेख

आगरकरांच्या निबंधांना अधिष्ठानभूत असलेली मूल्य म्हणजे

१) बुद्धिप्रामाण्यवाद, २) व्यक्तिस्वातंत्र्य, ३) ऐहिक सुख, ४) पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुसरण, ही सारी मूल्ये आदर्श समाज व आदर्श व्यक्ती घडविण्यास कितपत उपयुक्त आहे, ह्याचे उत्तर आजची जागतिक प्रवृत्ती व भारतीय समाजाची आजची स्थिती देत आहे. आगरकरांना अभिप्रेत असणाज्या बहुतेक सुधारणा आज समाजात रूढ झाल्या आहेत, पण त्यांनी समाज-जीवनाची पातळी कितपत उंचावली आहे ह्याचा विचार करणे आवश्यक नाही. तर इथे फक्त आगरकरांच्या निबंधाचे वाङ्मयीन मूल्ये विचारार्ह आहे.

आगरकरांची मते कोणतीही असोत, पण ती समाज कल्याणाच्या तळमळीने व्यक्त झाली असल्यामुळे अत्यंत प्रभावी व भावोत्कट आहेत. आगरकरांचे जीवनही अत्यंत त्यागी होते. घ्बोले तैसा चालेङ हे त्यांचे ब्रीद होते. ते बुद्धिवादी असल्यामुळे त्यांना धर्मातील शास्त्रप्रामाण्य व अधिकारवाद मान्य नव्हता. तसेच समाजात जे भिन्न भिन्न धार्मिक आचार व रूढी ह्यांचे प्राबल्य आहे तेही मान्य नव्हते. त्यांची दृष्टी उपयुक्ततावादी व सौंदर्य होती. म्हणून त्यांनी सर्व प्रकारच्या धार्मिक प्रथा-परंपरावर कठोर हल्ला चढविला. पण हा हल्ला निर्दय व कठोर असला तरी तो आंतरिक तळमळीतून व्यक्त

झाला असल्यामुळे त्यात ओज, आवेश, आवेग इत्यादी गुणांचा सहजपणे आविष्कार झाला.

त्यांच्या निबंधाच्या वाङमयीन गुणामुळे त्यांचे निबंध मराठी भाषेला भूषणभूत झाले पण त्यांच्या वाङमयीन महत्तेचे यश त्यांच्या तळमळीत आहे. विचार प्रक्षोभातून त्यांचे निबंध जन्माला आले आहेत. त्यांच्या निबंधात भावनांचे, विकाराचे उत्कृष्ट आवेग दिसून येतात. विरोधकांवर (सनातन्यांवर) हल्ला चढविताना त्यांच्या लेखणीला विलक्षण धार चढते. एकाहून एक सरस कोटीक्रम बाहेर पडू लागतात. त्यांच्या बोचक-खोचक उपहासाने विरोधकांना नामोहरण झाल्यासारखे वाटते, त्यांच्या वक्तृत्वपूर्ण आणि वक्रोक्तीपूर्ण शैलीमुळे वाचक स्तंभित होतो.

आगरकरांची भाषा विलक्षण ओजस्वी व ओघवती आहे. त्यांची वाक्ये बहुधा लांब व पल्लेदार असतात. त्यामुळे त्यात वक्तृत्वगुण निर्माण होतो. त्यांच्या लेखणीत रसक्ताही आहे. त्यांच्या वाणीतून संताप, चीड, उपरोध, कारूण्य इत्यादी विविध भावनांचा कल्लोळ उत्पन्न होतो व निबंधाची रसक्ता वाढत जाते. शृंगार, वीर, करूण, भयानक, बिभत्स इत्यादी रसांचा प्रत्येय येतो.

आगरकरांच्या निबंधाचा एक विशेष म्हणजे समर्पक व प्रभावी अलंकारांची योजना, विविध प्रकारच्या अर्थालंकारांनी विभूषित झालेली भाषा व वर्ण्य विषयासंबंधी उत्कट जिव्हाळा, ह्यामुळे त्यांच्या निबंधात काव्यात्मकता निर्माण झाली आहे. त्यांची शब्दयोजनाही नाविन्यपूर्ण असते. त्यांच्या भाषेत इंग्रजी भाषेतील अनेक शब्दांना मराठी पर्याय शब्द आलेले आहे. संस्कृत शब्दांचा वापरही बऱ्याच प्रमाणात झालेला आहे. भाषेला हवे तसे नाचविण्यात आणि तिचे रूपसौंदर्य वाढविण्यात आगरकर अत्यंत कुशल आहेत.

थोडक्यात आगरकरांचे ध्येयनिष्ठ व्यक्तीत्व त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबित होते. त्यांच्या स्वभावातील निर्भीडपणा, सत्यनिष्ठा, विनोदप्रियता, रसिकता, काव्यात्मकता, सडेतोडपणा हे सर्व गुंण त्यांच्या वाङमयात आढळतात. त्यात ओज आणि आत्मविश्वास आढळतो. तत्वनिष्ठा, विचार गांभीर्य, समाजहिताची कळकळ ह्यासारख्या विविध गुणांमुळे त्यांचे निबंध वाङमय रसाळ व चैतन्यपूर्ण बनले आहे. त्यांचे विचार कुणाला पटो अथवा न पटो पण त्या विचारामागची तळमळ, कळकळ मोहून टाकते ह्यात शंकाच नाही.

संदर्भ -

१) मराठी वाङमयाचा इतिहास - रा. ना. घाटोळे
२) मराठी वाङमयाचा इतिहास - खंड ५ वा, भाग - २
३) मराठी वाङमयाचा इतिहास - अ. ना. देशपांडे
४) मराठी नाट्यकला आणि नाट्य वाङमय - श्री. ना. बनहट्टी
५) मराठी नाट्य समीक्षा - रा. शं. वाळिंबे

❑❑❑

26

# संत तुकाराम महाराज यांच्या साहित्यातील वैचारिकता

प्रा.डॉ. सतीश प्रल्हाद घाडगे
पदव्युत्तर मराठी विभाग,
श्री खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड

**********

**प्रस्तावना :**

समाजातील निरनिराळ्या स्थरांवर अनेक प्रकारच्या प्रश्नांच्या संदर्भात प्रबोधन होणे गरजेचे असते. एकंदर समाजपुरूष हा गतानुगतिक असल्यामुळे काही समस्या परंपरेने रूढ होतात, या रूढी समाजमनात बळकटी घेतात. जेव्हा माणूस स्वीकृत रूढींच्या एककल्ली होऊन अंधविश्वासपूर्वक अनुकरणप्रियता जोपासतो तेव्हा या संदर्भात यथार्थ प्रबोधन होणे ही काळाची गरज होते. तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, नवससायास, यज्ञयाग, अंगात येणे, बुवाबाजी, विधिनिषेध, जादूटोणा या क्षेत्रांत समाजमन गुंतले की त्यांना ते सर्वस्व वाटते. त्यांचे आचरण म्हणजे धर्माचरण होते. अशा प्रसंगी तुकारामांनी लोकशिक्षकाची भूमिका घेऊन जे प्रबोधन केले, त्याबद्दल चर्चा घडविणे, हे या लेखाचे स्वरूप असून यातून आज समाजप्रबोधन व्हावे हा हेतू आहे, हे प्रबोधन होत असताना भ्रष्टाचार, अतिरेकीपणा, लोकप्रशासन, निरनिराळी व्यसने, कुटूंब कल्याण याही संदर्भात बहुजन समाजात संत तुकारामांच्या अभंगवाणीचा उपयोग कसा करता येईल, या संबंधी विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, नवससायास, यज्ञयाग, बुवाबाजी इत्यादी संदर्भात समाजातील सर्व स्थरांत अंधश्रध्दा रूजलेल्या होत्या, आहेत. या सर्व अंधश्रध्दांचे निर्मूलन करण्यासाठी वैचारिक तुकारामांचे रूप शोधणे हे या लेखाचे स्वरूप आहे.

**संतानप्राप्ती : रजोवीर्य जननक्षम हवे -**

मूल व्हावे असे प्रत्येकाला वाटते. काहींना ते होत नाही. त्याचे कारण स्त्री किंवा पुरूषात दोष असतो. संतान प्राप्तीसाठी रजोवीर्य जननक्षम हवे. कोणत्याही कारणाने मूल झाले नाही तर समाजमन कमकुवत बनते. हे कमकुवत मन अंधविश्वासाला बळी पडते. हा अंधविश्वास समाजातील सर्व स्थरांत दृढ होतो. हा अंधविश्वास खेड्यांत, शहरांत, महानगरांतही दिसून येतो. समाजातील अठरापगड जातींत

# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020 09

Peer Reviewed International Refereed Research Journal







## शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व
## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने

# "राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद




प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव

# INDEX

01) Rajarshi Shahu Maharaj Social Reformist and Visionary King
**Dr. Vaishali E. Aher, kaij** ||17

02) ज्योतिबा फुले तथा शूद्र—अतिशूद्र एकता
**डॉ. सुब्राव नामदेव जाधव, बार्शी** ||19

03) सामाजिक क्रांतीचे शिल्पकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर
**डॉ. शिवाजी हरी चौगुले, शिंदेवस्ती-बोंडले** ||22

04) महात्मा ज्योतिराव फुले यांचे सामाजिक विचार
**प्रा.डॉ. चंद्रसेन सावळाराम आवारे, बीड** ||25

05) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक धोरण
**प्रा.डॉ. देशमुख आर. के., बीड** ||28

06) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार
**डॉ. ढास डी. के., बीड** ||30

07) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रविषयक विचार
**डॉ. खरोसे भिमाशंकर, डॉ. सोलंकर आर. आर., उस्मानाबाद** ||34

08) महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक विचार
**डॉ. अशोक गौरीशंकर माळगे, अक्कलकोट** ||37

09) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धम्म कार्य
**डॉ. संजय तुकाराम वाघमारे, अकलूज** ||40

10) राजर्षी शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार व कार्य
**डॉ. अत्तार अमजद हारूण, उस्मानाबाद** ||43

11) राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती
**प्रा.डॉ. बी. एल. म्हस्के, प्रा. के. आर. गहिलोद, जालना** ||45

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | February 2020 Special Issue-09 | 025

04

# महात्मा ज्योतिराव फुले यांचे सामाजिक विचार

प्रा.डॉ. चंद्रसेन सावळाराम आवारे
मराठी विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

**********

**प्रस्तावना :-**

महात्मा ज्योतिराव फुले हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक होते. बहुजन समाजोद्धारक म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांचे जीवन कार्य अत्यंत मोलाचे आहे. महाराष्ट्राच्या समाजकारणात प्रबोधनाची ज्योत पेटवत ठेवणारे विचारवंत म्हणून महात्मा फुले यांचेकडे पाहिले जाते. महाराष्ट्राच्या इतिहासात शुद्रातिशूद्र वर्गाच्या मानवी हक्काबद्दल आवाज उठविणारे आद्य समाजसुधारक म्हणून ज्योतिबा फुले ओळखले जातात. तसेच त्यांना स्त्रीमुक्ती चळवळीचे आद्यप्रवर्तक देखील मानले जाते. त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांकडे जातीने लक्ष दिले. स्त्री-पुरुष समानतेसाठी व स्त्री शिक्षणासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सर्मपित केले. स्त्री-पुरुष समानता, स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निवारण, शेतकरी व कामगारांचे प्रश्न समाजापुढे आणि तत्कालीन इंग्रज सरकारपुढे मांडण्याचे धाडस त्यांनी दाखविले. धार्मिक रुढी, परंपरा व धर्माची कोणत्याही प्रकारची भीडभाड न ठेवता त्यांनी आपले कार्य सुरुच ठेवलेले दिसून येते.

महात्मा फुलेंच्या या कार्यामुळे वरिष्ठ वर्गाच्या हितसंबंधाला बाधा पोहचली, त्यामुळे त्या वर्गातील लोकांनी त्यांच्या विरोधात ओरड सुरु केली. ब्राम्हणी धर्मातील कावेबाजपणा त्यांनी उघडकीस आणला. धर्माच्या नावावर सर्वसामान्य जनतेचे होणारे शोषण प्रथम उघड करण्याचे मोठे सामाजिक कार्य त्यांनी केले. स्मृती, पुराणे, श्रुती आणि ब्राम्हणी ग्रंथाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या गुलामगिरीतून सर्वसामान्य बहुजनांना मुक्त करण्यासाठी १८७३ साली त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून ते मानवी प्रतिष्ठा, धार्मिक सहिष्णूता, मानवी हक्क आणि मानवी समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील राहिले. ब्राम्हण वर्गाने धर्माच्या आधारावर शूद्र व स्त्रियांचे शोषण केलेले होते. मूर्तिपुजा, चातुवर्ण्य व्यवस्था आणि कर्मकांडात अडकलेल्या समाजाची लूट या पुरोहित वर्गाने चालविलेली होती. ब्राम्हण वर्गाच्या या मानसिक गुलामगिरीतून समाज व्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी महात्मा फुले यांनी सातत्याने प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यासाठी त्यांनी सभा, संभाषणे, पत्रके, विविध संस्था व शाळांची स्थापना व ग्रंथलेखन करुन आपले विचार सर्वसामान्य समाजापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला पहावयास मिळतो.

**उद्दिष्ट्ये :-**

१. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सामाजिक विचारांचा परामर्श घेणे.
२. तत्कालीन महाराष्ट्राच्या समाज जीवनातील अज्ञान, अंधश्रद्धा, जातीयता इ. समस्यांची तीव्रता जाणून घेणे.

**परिचय :-**

महात्मा फुले यांचे मूळ घराणे सातारा जिल्ह्यातील कलगुण येथील खेड्यात राहणारे होते. त्यांचे आजोबा व्यवसायाच्या निमित्ताने पुण्यात स्थायिक झाले. त्यांचे आडनाव गोऱ्हे होते. पण ते पुण्यामध्ये पेशव्यांना फुले पुरविण्याचे काम असल्यामुळे लोक त्यांना फुले म्हणू लागले. नंतर फुले हे त्यांचे आडनावच बनले. फुले यांच्या वडीलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई होते. फुलेंचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. फुलेंची आई लहानपणीच वारल्यामुळे त्यांचा सांभाळ सगुणा क्षीरसागर नामक विधवा बाईने केला. वडील गोविंदराव हे प्रतिष्ठित व व्यावसायिक ग्रहस्थ होते.

फुलेंचे प्राथमिक शिक्षण स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये झाले. मिशनरी शाळेत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण चांगल्याप्रकारे झाली. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचा विवाह सावित्रीबाईशी झाला. थॉमस पेन यांच्या 'राईटस् ऑफ मॅन' या ग्रंथाचा त्यांच्यावर विद्यार्थी दशेत खुप मोठा प्रभाव पडला. तत्कालीन समाजाची दैन्यावस्था पाहून त्यांनी सरकारी नोकरी न करण्याचा निर्णय घेतला.

**लेखन :-**

तत्कालीन समाजव्यवस्थेत अनिष्ठ रुढी, कर्मकांड, परंपरा आणि वाईट प्रथांचे स्त्रोत माजले होते. शूद्रांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय, अत्याचार होत होते. स्त्रियांची स्थिती शूद्रांपेक्षाही वाईट होती. त्यांना समाजात दुय्यम स्थान होते. या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी 'दीनबंधु' या मासिकातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर 'शेतकऱ्यांचा आसूड', 'गुलामगिरी', 'अस्पृश्यांची कैफियत', 'शिवाजींचा पोवाडा', 'इशारा', 'तृतीय रत्न' आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' इ. ग्रंथाचे त्यांनी लेखन केले आहे. 'अखंड' नावाने काही अभंगाची रचनाही केली आहे. महात्मा फुले यांनी ग्रंथ लेखनाच्या माध्यमातून बहुजन समाजाची मानसिक गुलामगिरीतून

सुटका करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या मूल्यांवर नवसमाजाची उभारणी करावयाची असेल तर तत्कालीन समाजाची बौद्धिक मशागत करणे आवश्यक होते. शोषणा मागील मानसिक, सांस्कृतिक आणि आर्थिक कारणे समजून घेतल्याशिवाय त्याचे स्वरुप लक्षात येणार नाही आणि त्यांचे निराकरण देखील करता येणार नाही, या व्यापक उद्देशाने त्यांनी आपले लेखन केलेले आहे.

**सामाजिक कार्य :-**

लेखनासोबतच समाज व्यवस्थेला निश्चित दिशा देण्यासाठी नियोजनबद्ध व्यूहरचना करणे आवश्यक असते. या जाणिवेतून त्यांनी १८४८ साली पुण्यात बुधवार पेठेतील भिडेंच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली. आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला करुन सामाजिक क्रांतीचा संदेश स्वत: कृतीतून दाखवून दिला. १८५१ साली सर्व जातींच्या मुलांसाठी आणि अस्पृश्य जातीतील मुलांसाठी पुण्यातील नाना पेठेत शाळा काढली. १८५२ साली मागासवर्गीयांसाठी एक मोफत वाचनालय सुरु केले. केशवपणाची रुढी बंद करण्यासाठी पुण्यामध्ये त्यांनी न्हाव्यांचा संप घडवून आणला. कुमारी माता व विधवा मातांचा प्रश्न सोडविण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. विधवा पुर्नविवाहाचे मोठ्या जोमाने समर्थन केले. १८६० साली पहिला पुर्नविवाह घडवून आणला. फुलेंच्या या सर्व कार्याला त्यांनी पत्नी सावित्रीबाईंची मोलाची साथ मिळाली. मुलींच्या शाळेसाठी शिक्षिका मिळत नसल्याने त्यांनी स्वत: सावित्रीबाईस शिकविले आणि शिक्षिका बनविले. काशिबाई नावाच्या विधवा ब्राम्हण स्त्रीचा मुलगा यशवंत यास दत्तक घेतले. वंचित वर्गाला सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी महात्मा फुले आणि त्यांनी पत्नी सावित्रीबाई फुले यांनी आयुष्यभर प्रयत्न केलेले दिसून येतात. आपल्या समाजसुधारणेच्या कार्यास संघटनेची जोड देण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे त्यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. त्यांच्या या सर्व कार्याचा गौरव म्हणून ११ मे १८८८ रोजी जनतेने ज्योतिरावांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली.

**महात्मा फुले यांचे सामाजिक विचार :-**

महात्मा फुले हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक होते. त्यांना सामाजिक सुधारणा क्रांतीचे आद्यप्रवर्तक मानले जाते. दलित शोषितांच्या मुक्तीचे उद्दिष्ट समोर ठेवून देशात जनआंदोलन चालविणारे फुले हे पहिले समाजसुधारक होते. त्यांच्या चळवळीमुळे दलित व शोषित वर्गात खऱ्या अर्थाने आत्मभान निर्माण झाले. या आत्मभानामुळे शोषित वर्गात संघर्ष करणारी नेतृत्त्वाची नवी पिढी निर्माण झाली. सामाजिक चळवळीचे देशी तत्त्वज्ञान फुले यांनी विकसित केले. त्यांच्या चळवळीमुळेच वंचिताच्या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधले गेलेले दिसून येते.

महात्मा फुलेंनी समता व मानवी प्रतिष्ठा यांना आप[illegible] सामाजिक विचारात सर्वोच्च प्राधान्य दिलेले आढळून येते. भारती[illegible] समाजव्यवस्थेचा विकास होत असताना समता आणि बंधुभाव या तत्त्वांचा ऱ्हास घडून आला होता. वर्णव्यवस्था व जातीय व्यवस्थेमुळे समाजात विषमता निर्माण झाली होती. शूद्र, स्त्रिया आणि वंचित वर्ग यांचे प्राथमिक अधिकार देखील नाकारण्यात आलेले होते. सामाजिक गुलामगिरीत अडकलेल्या सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी महात्मा फुलेंनी चळवळ सुरु केली आणि नैसर्गिक मानवी हक्कांसाठी अविरत लढा दिला.

भारतीय समाजरचना ही ईश्वर प्रणित, स्वयंभू व चिरंतन नाही. जन्मत:च सर्व भारतीय समान आहेत, या धारणेतून न्याय व समतेवर आधारीत समाजाची उभारणी करण्याचा प्रयत्न महात्मा फुलेंनी केला. तसेच वाईट चालीरिती व प्रथांवर त्यांनी कडाडून हल्ला चढविला. समाज परिवर्तनासाठी कनिष्ठांनी शिक्षणाची कास धरली पाहिजे. तसेच अज्ञानाचा अंध:कार दूर केल्याशिवाय प्रग[illegible] मार्ग सुकर बनणार नाही, असे महात्मा फुलेंचे मत होते.

समाजातील विषमता ही ईश्वरनिर्मित नसून मानव निर्मित आहे. या देशातील उच्चवर्गीय ब्राम्हणशाहीने व धर्मग्रथांनी विषमता निर्माण केली आहे. त्यांनीच विषमतेला खतपाणी घालणाऱ्या रुढी, परंपरा व प्रथांची निर्मिती केली आहे. व्यक्तीची गुणवत्ता व क्षमता न पाहता जन्माच्या आधारावर व्यक्तीचे स्थान ठरविले आहे. कनिष्ठ वर्ग व स्त्रियांना पशू-पेक्षापेक्षा हीन दर्जा दिला होता. समाजातील विषमता कायम टिकवून ठेवण्यासाठी कनिष्ठांना स्पर्शबंदी व ज्ञानबंदी सारख्या उपाययोजना करुन ठेवल्या होत्या. स्वधर्म पाळण्यातच समाजाचे भले होईल असे कनिष्ठ वर्गाच्या मनावर ठसविले गेले होते. कनिष्ठ वर्गाला ज्ञानर्जन व धनसंचयापासून दूर ठेवून त्यांना कायमचे परावलंबी बनविले होते.

आदिम अवस्थेत सर्वांना समान अधिकार होते. सर्व मानव समान व ईश्वराची लेकरे होती. परंतू आर्य लोकांनी कनिष्ठांचे सर्व नैसर्गिक अधिकार अमान्य करुन आपले वर्चस्व निर्माण करण्य[illegible]ी समाजात जातीय विषमता निर्माण केली होती. तसेच विषमता ही ईश्वरप्रणित असल्याचा देखावा उभा केला होता. फुलेंच्या मते विषमतेला कारणीभूत ठरणारी प्रमुख संस्था म्हणजे जाती व्यवस्था होय. जाती व्यवस्था ही ब्राम्हणांना झुकते माप देते आणि शूद्रावर अन्याय करते, हे फुल्यांनी सप्रमाण सिद्ध करुन दाखविले. जातिव्यवस्थेच्या आधारावर कनिष्ठ वर्गाला कायमस्वरुपी गुलामगिरीत कैद करुन ठेवले होते. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक आणि कर्म सिद्धांताच्या आधारावर विषमतेची पाळे मुळे मजबूत केली होती. या विषमतेला सहाय्यभूत ठरणाऱ्या सर्वच गोष्टींना महात्मा फुलेंनी कडाडून विरोध

केला. जन्मसिद्ध श्रेष्ठत्त्व आणि कनिष्ठत्त्व या दोन्ही गोष्टी नाकारल्या. सर्व मानव ही ईश्वराची लेकरे असल्यामुळे त्यांना समान हक्क उपभोगण्याचा अधिकार आहे. थॉमस पेनच्या विचारांची प्रेरणा घेवून त्यांनी मानवाच्या नैसर्गिक अधिकाराचे समर्थन केले आहे. मानवास ईश्वराने निर्माण केले आहे व ईश्वरानेच जन्मतः समान अधिकार दिलेले असल्यामुळे ते हिरावून घेण्याचा कोणालाही अधिकार नाही. जातींच्या आधारावर केल्या जाणाऱ्या भेदभावास फुलेंनी विरोध केला व समाजाची केली जाणारी अनैसर्गिक विभागणी त्यांनी अमान्य केली.

त्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून धार्मिक क्रिया कर्मातील गोंधळ नष्ट करण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजातील कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देवून ब्राम्हणांच्या धार्मिक क्षेत्रातील मक्तेदारीला सुरंग लावला. शिक्षण, प्रबोधन, कायदे आणि व्यवसाय स्वातंत्र्याच्या माध्यमातून विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. समतेवर आधारीत समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शूद्र व स्त्रियांची गुलामगिरीतून सुटका फक्त शिक्षण घेतल्यानेच होईल, अशी त्यांची ठाम धारणा होती. म्हणून त्यांनी त्यांच्यासाठी शाळा सुरु केल्या. शिक्षण नसल्यामुळे त्यांचा धर्मग्रंथातील अनेक अनिष्ठ गोष्टींवर विश्वास बसला होता. अज्ञानामुळे अन्याय व अत्याचाराची जाणिव होत नव्हती. भारतीय समाजव्यवस्थेत ब्राम्हणी वर्चस्वाचा अंत करणारे साधन म्हणून फुले शिक्षणाकडे पहात होते. ब्राम्हणी व्यवस्थेने कनिष्ठ वर्गाला शिक्षणाचा अधिकार नाकारुन आपले आसन अधिक बळकट केले होते. इंग्रज भारतात आल्यानंतर परिस्थितीत हळूवारपणे बदल होण्यास सुरुवात झाली. त्यांनी बहुजन वर्गातील लोकांना शाळेत प्रवेश देण्यास सुरुवात केली.

इंग्रज सरकारने पददलित वर्गाच्या शिक्षणाची जबाबदारी स्विकारावी, त्यांना व्यवहार उपयोगी शिक्षण द्यावे, ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करावा, आणि त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीस प्राधान्य द्यावे, असे मत व्यक्त करुन ज्योतिबांनी वंचित वर्गाच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने घ्यावी असे अप्रत्यक्षपणे सूचविले होते. शिवाय सरकारने शूद्रांसाठी शाळा सुरु करुन शूद्र शिक्षकांची शाळेत भरती करावी, अशी सूचना ही केली आहे. शिक्षणाबद्दलचा फुल्यांचा विचार खालील ओळीतून चांगल्या पद्धतीने व्यक्त होतो.

"विद्येविना मती गेली। मती विना गती गेली।
गती विना वित्त गेले। वित्ता विना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।"

ऐहिक जीवनात व्यक्तीला आत्मिक व मानसिक समाधान मिळवून देण्यासाठी न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधूता या तत्त्वांवर आधारलेला समाज निर्माण करण्याची तळमळ ज्योतिबांना होती. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी अस्पृश्यता निवारणाला प्राधान्य दिले. समाजातील अनिष्ठ रुढी, अंधश्रद्धा व कर्मकांड नष्ट करण्याचा प्रयत्न केला. सर्व माणसे ही देवाची लेकरे आहेत, त्यामुळे जाती, धर्म व लिंगाच्या आधारावर केला जाणारा भेदभाव अयोग्य आहे. देवाने प्रत्येक व्यक्तीला जन्मजात काही अधिकार बहाल केलेले आहेत. त्यामुळे सर्वांना समान संधी देणे आणि सर्वांना समान वागणूक मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे. महात्मा फुलेंनी हिंदू धर्माची चिकित्सा करुन त्यातील फोलपणा सर्वांना दाखवून दिला आहे.

कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची जी ज्योत तेवत होती, ती वेदोक्त चळवळीनंतर अधिक प्रज्वलित झाली. ज्योतिरावांच्या तत्वज्ञानात जातीभेद, मूर्तिपुजा यांना अजिबात स्थान नव्हते. देव आणि मनुष्य ह्यामध्ये दलाल (मध्यस्थ) नसावा. मनुष्य जन्माने श्रेष्ठ ठरत नाही, तर तो आपल्या कर्माने श्रेष्ठ व कनिष्ठ ठरत असतो. धर्म, कर्म व व्यवहार यात मनुष्य नाडला जावू नये, म्हणून धर्मभोळेपणा व धर्मवेडेपणा जावा. "मानवाचा धर्म। सत्यनीति हीच।।" कोणताही धर्मग्रंथ देवनिर्मित नाही. देवाला महात्मा फुले निर्मीक म्हणत. त्यांना बुद्धीप्रामाण्य, समता नि मानवता ह्या तत्त्वांवर आधारीत अशी समाजाची पुर्नरचना पाहिजे होती, म्हणून ज्योतिराव म्हणतात की,

"धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्याने वागावे। ईशासाठी।।
ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राम्हणांसी। धरावे पोटाशी। बंधूपरी।।
निर्मिकांचा धर्म सत्य आहे एक।
भांडणे अनेक। कशासाठी।।"

एकंदरीत महात्मा फुलेंचे विचार हे सामाजिक बंडखोरीच्या जवळ जाणारे वाटतात. आपल्या विचार आणि कार्यातून महात्मा फुले यांनी मांडलेले विचार आजही परिवर्तन चळवळीला मार्गदर्शक ठरु शकतील, असेच आहेत, यात तीळमात्र शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. महात्मा फुले - लक्ष्मण सूर्यभान - राजश्री प्रकाशन, पुणे.
२. प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती - धनंजय कीर - व्याख्यानमाला - मार्च १९७०.
३. भारतीय राजकीय विचारवंत - डॉ. महेंद्र पाटील - विद्या बुक्स, औरंगाबाद.
४. महात्मा ज्योतिराव फुले - धनंजय किर - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२००८.
५. महात्मा ज्योतिराव फुले - प्रा.ना.ग. पवार / अविनाश वरोकर- पद्मगंधा प्रकाशन, पुणे-२०००.
६. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास - प्रा. दिनेश मोरे.
७. साठ महामानव - प्रा.सौ. माधवी कवी - विद्याभारती प्रकाशन.

❑❑❑

बावीसावी
आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील स्त्री कर्तृत्वाचे योगदान
## भाग २


संपादक
डॉ.स्नेहल तावरे
डॉ. शिवलिंग मेनकुदळे
डॉ. संजय नगरकर
डॉ. सविता पाटील



स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

## बहिणाबाईंची गाणी - बहिणाबाई चौधरी

- डॉ. चंद्रसेन सा. आवारे

बहिणाबाईंनी मराठीच्या काव्य प्रातांत जानपद गीतांची परंपरा सुरू केली. ग्रामीण जानपद गीते लिहिणारी ही पहिलीच महिला कवयित्री आहे. बहिणाबाई या अशिक्षित, निरक्षर होत्या. त्या आता एकाकी पडल्यामुळे कष्टमय जीवन त्या जगत होत्या. सकाळपासून ते संध्याकाळपर्यत फक्त कामच करणे, हाच पर्याय त्यांच्यासमोर उरला होता. कारण शेतीशिवाय उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेच साधन त्यांच्याकडे नव्हते. त्यामुळे फक्त शेतात कष्ट करणे हेच त्यांच्या नशिबी आले होते. या कष्टातूनच त्यांचे व्यक्तीमत्व घडत होते. त्या निरक्षर असल्या तरी शिक्षितालाही लाजवील असं त्यांच तत्वज्ञान होतं. अनुभवाचा ठेवा हाच त्यांचा ज्ञानाचा ठेवा होता. काळ्या आईजवळ बसून त्या आपलं सुख-दुःख सांगत. खडकातून पाझरणाऱ्या निर्मळ झऱ्यासारखी त्यांनी आपली गाणी (कविता) लिहिली आहेत. साक्षात सरस्वतीचा वरदहस्तच त्यांना लाभला होता. म्हणूनच त्या म्हणत असत -

'माझी माय सरसोती। माले शिकवते बोली।'

या थोर वारसामुळे त्यांचे साधे बोलणेही गाणे होवून जाई.

काव्य गुणांच्या बाबतीत लक्ष्मीबाई टिळक यांची मोठी बहिण शोभावी एवढा अधिकार बहिणाबाईंचा होता. त्या केशवसूत, कवी बी., कवी विनायक, भा.रा. तांबे, कवी गोविंदाग्रज इ. श्रेष्ठ कवींच्या समकालीन होत्या. परंतु हे अस्सल सोनं तसचं दडून पडले होते. कवी सोपानदेव चौधरी हे त्यांचे चिरंजीव होते. बहिणाबाईंची स्मरणशक्ती अतिशय तीव्र होती. 'आदिमाया' ही त्यांनी रचलेली कविता त्यांच्या घरी प्रार्थना म्हणून म्हणत असत. त्यांच्या घरातील वातावरण आध्यात्मिक स्वरुपाचे होते. त्या निरक्षर असल्यामुळे इतरांचे काव्य त्यांना वाचता येणं शक्य नव्हते. त्यामुळे त्यांची कविता स्वतंध्य होती. कोणाच्याही काव्याचा प्रभाव त्यांच्यावर नव्हता. त्यांची कविता स्वयंप्रेरित होती. त्या गाणी म्हणत, तेव्हा सोपानदेव ती गाणी कागदावर उतरुन घेत असत.

बहिणाबाई या प्रसिद्धीपासून चार हात दूर होत्या. त्यांच्या कवितेचा संग्रह (बहिणाबाईंची गाणी) त्यांचे पुत्र सोपानदेव चौधरी यांनी त्यांच्यां मृत्युनंतर १९५२

साली प्रसिद्ध केला. तेव्हाच खऱ्या अर्थाने बहिणाबाई रसिकांसमोर आल्या. त्यांच्या कवितेच्या रुपाने मराठी काव्याला जुन्या-नव्यांचा संगम साधणारी सुंदर, समृद्ध कविता मिळाली. 'निसर्गकन्या बहिणाबाई' हे बिरुद त्यांना खरेच शोभणारे होते. त्यांच्या काव्याचे स्वरूप, निसर्ग, व्यक्तिचित्रणे, विचार सौंदर्य, म्हणी व आत्मिक स्वरूपाचे आहे. खानदेशच्या अहिराणी बोलीत त्यांची कविता आहे. मराठी चित्रपटातही त्यांची गाणी विशेष लोकप्रिय झाली आहेत. 'अरे संसार संसार' हे त्यांचे गाणे आजही प्रत्येकाच्या ओठावर आहे. त्यांचे प्रत्येक गाणे एक संसार आहे, एक विचार आहे, एक अनुभव आहे, एक शिकवण आहे.

आपल्या माहेरचे आणि सासरचे चित्र बहिणाबाईंनी आपल्या काव्यातून अतिशय चपलखपणे चितारले आहे. त्यात माहेरचे कौतुक आहे. तर सासरचे कर्तव्य देखील आहे. दुःखाने त्या होरपळून निघाल्या असल्या तरी त्या डगमगल्या नाहीत. संसाराचा गाडा त्यांनी मोठ्या हिमंतीने पुढे रेटलेला दिसून येतो.

''असे संसार संसार । जसा तवा चुलीवर ।
आधी हाताले चटके । मग मियते भाकर ।''

असा हा संसाराचा गाडा किती कष्टमय असतो, हेच त्यांनी आपल्या जीवन अनुभवातून दाखवून दिलेले आपणास दिसते.

मराठीत जानपद गीते लिहिणारी पहिली कवयित्री म्हणून बहिणाबाईंचा उल्लेख करावा लागेल. मराठी ग्रामीण कवितेची प्रथम पावले आपणास मराठी जानपद गीतात पहावयास मिळतात. आधुनिक मराठी साहित्यात मराठी ग्रामीण कवितेची पहाट जानपद गीतांतून उगवली आहे. त्याबाबत प्रा. जहांगीरदार म्हणतात, ''भा.रा. तांबे यांच्या 'गुराख्याचे गाणे', 'दुष्काळानंतर सुकाळ', 'रासमंडळ गोपीचंद' यासारख्या काही कवितांमधून येणारे ग्रामीण वास्तव हा मराठी जानपद काव्याचा प्रारंभ मानला जातो. गिरिषांची-'भलरी' ही कविता ग्रामीण जीवन, ग्रामीण बोलीतून चितारणारी कविता आहे. चंद्रशेखरांचे - 'काय हो चमत्कार' आणि गिरिषांचे 'आंबराई' ही दोन्ही खंडकाव्ये ग्रामीण जीवनातील माणसांवर लिहिलेली आहेत आणि १९३३ साली प्रसिद्ध झालेल्या 'सुगी' या प्रातिनिधिक कविता संग्रहात जानपद गीते लिहिणाऱ्या समकालीन कवितेचे प्रातिनिधीक दर्शन घडते.''

मराठी साहित्यात बहिणाबाईंच्या गाण्याने फार मोठी भर टाकली आहे. त्यांना सरस्वतीचा वरदहस्तच होता. त्यांचे सहज बोलणे, साधे बोलणे देखील गाणे होवून जाई. सकाळी त्या जात्यावर दळण दळायला बसल्या की, त्या जात्याशी हितगुज करीत म्हणत,

''अरे घरोटा घरोटा । तुझ्यातून पडे पिटी ।
तस माझं गाणं । पोटातून येतं व्होटी ।''

संत तुकाराम महाराजाप्रमाणे 'अंतरीचे धावे । स्वभावे बाहेरी ।' याच

प्रकारची बहिणाबाईंची कविता जातिवंत कलावंताची निर्मिती होती. खानदेशच्या अहिराणी बोलीत त्यांनी आपली गाणी रचली. या बोलीत एक प्रकारची गोडी, जिव्हाळा आहे. या बोलीच्या लडिवाळपणामुळेच त्यांची गाणी जास्तच मधुर झाली आहेत. त्यांच्या गाण्याचे विषय घरगुती, रोजच्या प्रपंचातले आणि शेतातले आहेत. त्यांच्या घरोटा, चुल्हा, पोया, खोपा, कापणी, मळणी इ. साध्या साध्या विषयातून त्यांनी ते जिवंत, जातिवंत काव्य निर्माण केले आहे. त्यांची कविता पाहून वाचकही थक्क होतो.

स्त्रियांना मूळातच माहेरची ओढ असते. बहिणाबाईंना तर माहेरची अतिशय ओढ आहे. त्यांना सतत त्यांच्या माहेरची आठवण येते. आपल्या माहेरच्या वाटेचे वर्णन करताना रस्त्यावरच्या साध्या दगडालाही त्या विसरत नाहीत. माहेरच्या वाटेवरच्या नदीच्या डोहात बसलेल्या म्हशी त्यांना आठवतात. त्यांची कविता वाचताना 'लौकी' नदीच्या काठचे वर्णन आपणास पहावयास मिळते. त्यांच्या वर्णनात भरगच्च बाजार असलेले, पान मळ्यांनी दाटलेले खानदेशातले एक रम्य खेडे आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. माहेरी कवयित्री लाडात वाढलेली होती. त्यांच्या वडिलांना गावात खूप मान होता, रुबाब होता. अशा सुखी गावात व घरात त्या वाढल्या पण सासरी आल्यावर त्यांना गुरा-ढोरासारखे काम करावे लागले, त्यामुळे त्यांना माहेरची आठवण येणे साहजिकच आहे. सण-उत्सवाला कधी तरी चुकून त्यांना कामाला सवड मिळायची, खेळायला मिळायचे, तशातच ऐन तारुण्यात त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. त्या दारुण दुःखाचे वर्णन त्यांनी,

'लपे करमाची रेखा। माझ्या कुंकवाच्या खाली।
पुशीसनी गेलं कुंकु। रेखा उघडी पडली।'

अशा शब्दांत केले आहे. 'उघडी' या एकाच शब्दातून अर्थपूर्ण आणि बोलक्या विशेषणाने त्यांच्या दुःखाची कल्पना आपणास येते. आपल्या अंतःकरणातील दुःखाचे कढ आवरीत त्यांनी धरणी मातेला प्रश्न विचारला आहे की,

'सांग सांग धर्ती माता। अशी कशी जादू झाली।
झाडं गेलं निघोसणी। मागे सावली न उरली।'

झाड आणि त्याची सावली या निसर्ग दृश्यातून त्यांचे आणि पतीचे अतूट नाते कळते. पती निधनाच्या दुःखातून त्या स्वतःला सावरतात, आणि स्वतःच्या मनाला आवर घालण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

'रडू नको माझ्या जीवा। तुला रडण्याची रे सव। रडू हासव रे जरा।'

अशी त्या स्वतःचीच स्वतः समज घालताना दिसून येतात. यावरून त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. त्या कशाला ही डगमगत नाही असे दिसून येते.

'जरी फुटल्या बांगड्या। मनगटी करतूत।'